**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. १०९** **दिनांक : २१/०१/२०२५**
**विभाग : प्रकल्प विभाग**

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ येथे भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये व व्यापारी संकुल विकसीत करणेचे काम बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित होते. सदर कामासाठी बांधकाम विभागामार्फत Spannex AEC Solutions Pvt. Ltd यांची संदर्भ क्र. १ अन्वये नियुकती केली आहे. त्यानुसार Spannex AEC Solutions Pvt. Ltd यांनी बांधकाम विभागाकडे दि. २५/०७/२०२३ रोजी आराखडे सादर केले होते. परंतु बांधकाम विभागामार्फत त्यावेळी कार्यवाही झालेली नाही.

नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणेचे काम प्रकल्प विभागामार्फत करणे बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे संदर्भ क्र. ३ अन्वये आदेश प्राप्त आहेत. त्यानुसार बांधकाम विभागामार्फत नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणेच्या फाईल्स प्रकल्प बांधकाम विभागाकडेस संदर्भ क्र. ४ अन्वये हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

बांधकाम विभागा मार्फत नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणे करिता सन २००९ ते सन २०१८ पर्यत स्थायी समिती व मा.महासभेचे अनेक वेळा ठराव घेण्यात आले. परंतु या अनुषंगाने विविध स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झालेनंतर याबाबतचा ठराव मा.शासनाचे दि. १२ जून २०१७ चे शासन निर्णयान्वये रद्द देखील झाले आहेत. तसेच सदर कामासाठी अनेक वेळेस निविदा देखील मागविण्यात येवून रद्द झालेल्या आहेत.

सद्यस्थितीत या कामासाठी Spannex AEC Solutions Pvt. Ltd यांनी सादर केलेल्या आराखडयास नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी घेणे Valuation ठरविणे व अंदाजपत्रकास व मा.शहर अभियंता यांचेकडून तांत्रिक मंजूरी घेणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी मान्यता दिले नंतर बांधकाम परवानगी, अनामत रक्कम व भाडे ठरविणे जागेचे मुल्यमापन करणे इत्यादी साठी सदरचा प्रस्ताव मा.सहाय्यक संचालक यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

. .

तसेच Spannex AEC Solutions Pvt. Ltd यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी मिळणे करिता मा.शहर अभियंता यांचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकाची रक्कम रू. १०,८८,१७,११३/-इतकी होत आहे. त्यास मा.शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे.

नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये मनपाचे निधी (अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कम ) अंतर्गत भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणेची बाब धोरणात्मक आहे. तसेच बांधकाम सुरू असताना किंवा बांधकाम पूर्ण झालेनंतर सदरचे गाळे, कार्यालय इत्यादी जागा भाडेतत्वावर देणेकामी लिलाव करणे योग्य राहील. यासाठी मा.महासभेची मंजूरी घेणे गरजेचे आहे. तसेच सदरचे काम मनपा मार्फत उभारावयाचे असल्याने अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेत प्रस्तावित करून ई निविदा मागविणे आवश्यक आहे.

करिता

१) नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणे व त्यानंतर भाडेतत्वावर देणेकामी लिलाव प्रक्रिया राबविणे

२) नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणेचे काम अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रक्कम या लेखाशिर्षका अंतर्गत प्रस्तावित करणेस

३) सदर कामासाठी ई निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजूरी देणेस प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. याबाबत विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ११०** **दिनांक :२१/०१/२०२५**

**विभाग : घनकचरा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती क्र. ४ मधील कचरा संकलन व वाहतुक करणेकरिता पुरविण्यात आलेल्या ट्रॅक्टर वाहनाचे दिनांक १३-०९-२०१६ ते दि.२१-११-२०१६ अखेरचे देयक अदा करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ४ मधील कचरा संकलन व वाहतुक करणेकरिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरवठा करणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक १२/०५/२०१४ रोजीच्या ई निविदा प्रसिध्दी मंजूरीनुसार मा.स्थायी समिती ठराव क्र. ८० दिनांक ०३/०९/२०१६ च्या ठरावान्वये रक्कम रूपये २५२०/- प्रति दिन या दराप्रमाणे कार्योत्तर मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार संदर्भांकित संस्थेने दि. १३/०९/२०१६ ते दिनांक २१/११/२०१६ अखेर खालील प्रमाणे ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरविले आहे. त्याप्रमाणे गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन | कामाचे दिवस | देयक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | टॅक्टर क्र. एम.एच.१६ एफ २२९७ | दि.१३/०९/२०१६ ते दि. २१/११/२०१६ व अखेर एकूण ६८ दिवस | रू. १,७१,३६०/- |

वरील प्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती क्र. ४ मधील कचरा संकलन व वाहतुक करणेकामी कंत्राटी पध्दतीने ठेकेदारामार्फत एकूण ६८ दिवस ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरविले आहे. त्यानुसार प्रति ट्रॅक्टर प्रति दिन रक्कम रू.२५२०/- प्रमाणे एकूण ६८ दिवसांचे देयक रक्कम रू १,७१,३६०/- चे देयक मागणीपत्र सादर केलेले आहे. सदर संस्थेने सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामधील असून कामाची तातडी व आवश्यकता लक्षात घेता संबंधीतांकडून सदरचे काम तातडीने करून घेण्यात आलेले आहे. तथापी मध्यंतरीच्या कालावधीमध्ये तत्कालीन लिपीक यांनी सदरचे देयक अदा न केल्यामुळे प्रलंबित राहिले असून तत्कालीन लिपीक हे मयत झाले आहेत. त्यामुळे सदरचे देयक अदा करणेकामी विलंब झालेला आहे.

तरी सदर कामाचे देयक प्राधान्याने अदा करणेस लेखा विभागास आदेश होणेस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केला असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १६८ नुसार मुदतबाहय मागण्या मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे.तथापी सदर देयकास मोठया स्वरूपात विलंब झाल्याने सदर देयक दुबार झाले किंवा नाही या बाबत संबंधित विभागाने खातरजमा करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. १११** **दिनांक :२१/०१/२०२५**

**विभाग : घनकचरा विभाग**

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती क्र. ४ मधील कचरा संकलन व वाहतुक करणेकरिता पुरविण्यात आलेल्या ट्रॅक्टर वाहनाचे दिनांक २१-०१-२०१७ ते दि.२१-०३-२०१७ अखेरचे देयक अदा करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र. ४ मधील कचरा संकलन व वाहतुक करणेकरिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरवठा करणेकामी मा.आयुक्त यांची दिनांक १२/०५/२०१४ रोजीच्या ई निविदा प्रसिध्दी मंजूरीनुसार मा.स्थायी समिती ठराव क्र. ८० दि. ०३/०९/२०१६ च्या ठरावान्वये रक्कम रू. २५२०/- प्रति दिन या दराप्रमाणे कार्योत्तर मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार संदर्भांकित संस्थेने दि.२१/०१/२०१७ ते दि. १९/०२/२०१७ व दि.२०/०२/२०१७ ते दि. २१/०३/२०१७ अखेर खालील प्रमाणे ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरविले आहे. त्याप्रमाणे गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन | कामाचे दिवस | देयक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | टॅक्टर क्र. एम.एच.१६ एफ २२९७ | दि.२१/०१/२०१७ ते दि. १९/०२/२०१७ व दि.२०/०२/२०१७ ते दि.२१/०३/२०१७ अखेर एकूण ६० दिवस | रू. १,५१,२००/- |

वरील प्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती क्र. ४ मधील कचरा संकलन व वाहतुक करणेकामी कंत्राटी पध्दतीने ठेकेदारामार्फत एकूण ६० दिवस ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुरविले आहे. त्यानुसार प्रति ट्रॅक्टर प्रति दिन रक्कम रू.२५२०/- प्रमाणे एकूण ६० दिवसांचे देयक रक्कम रू १,५१,२००/- चे देयक मागणीपत्र सादर केलेले आहे. सदर संस्थेने सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामधील असून कामाची तातडी व आवश्यकता लक्षात घेता संबंधीतांकडून सदरचे काम तातडीने करून घेण्यात आलेले आहे. तथापी मध्यंतरीच्या कालावधीमध्ये तत्कालीन लिपीक यांनी सदरचे देयक अदा न केल्यामुळे प्रलंबित राहिले असून तत्कालीन लिपीक हे मयत झाले आहेत. त्यामुळे सदरचे देयक अदा करणेकामी विलंब झालेला आहे.

तरी सदर कामाचे देयक प्राधान्याने अदा करणेस लेखा विभागास आदेश होणेस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केला असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १६८ नुसार मुदतबाहय मागण्या मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे तथापी सदर देयकास मोठया स्वरूपात विलंब झाल्याने सदर देयक दुबार झाले किंवा नाही या बाबत संबंधित विभागाने खातरजमा करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ११२** **दिनांक : २१/०१/२०२५**
**विभाग : बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ९ मधील सर्जेपूरा हरिजन वस्ती येथील सामाजिक सभागृहास "बल वात्सल्य " (वत्सलाबाई बलभिमराव जगताप सामाजिक सभागृह) असे नामकरण करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार श्री शेख आरिफ रफियोद्दीन मा.सभागृह नेता मनपा यांनी पत्र देवून अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. ९ मधील सर्जेपूरा हरिजन वस्ती येथील सामाजिक सभागृहास "बल वात्सल्य " (वत्सलाबाई बलभिमराव जगताप सामाजिक सभागृह ) असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद खालील प्रमाणे आहे.

१) कलम ४५७ मधील अ.क्र. १० क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक दणे आणि (जागांना क्रमांक देणे )या बाबींसाठी नियम करता येईल.

२) अनुसूची ड प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नांवे देणे आणि (जागांना )क्रमांक देणे १ अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपलिके मध्ये विहित असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. ९ मधील सर्जेपूरा हरिजन वस्ती येथील सामाजिक सभागृहास "बल वात्सल्य " (वत्सलाबाई बलभिमराव जगताप सामाजिक सभागृह ) असे नामकरण करणेस व सदर कामी येणा-या खर्चास प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. याबाबत विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ११३** **दिनांक :२१/०१/२०२५**
**विभाग : सामान्य प्रशासन विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** वरिष्ठ गट यादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्तीस्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२०२५ स्पर्धेच्या आयोजनासाठी रक्कम रूपये ५० लक्ष रूपयांचा निधी वितरीत करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उपरोक्त विषयाबाबत मा.आमदार श्री.संग्राम अरूणकाका जगताप, आयोजक तथा अध्यक्ष, अहमदनगर (अहिल्यानगर) जि.कुस्तीगीर संघ यांनी उक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले की, ६७ व्या वरिष्ठ गट यादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्तीस्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२०२५ च्या आयोजनाची जबाबदारी अहमदनगर (अहिल्यानगर) कुस्तीगीर संघास मिळालेली असून सदर स्पर्धा २६९ जानेवारी (बुधवार) ते दिनांक २ फेब्रुवारी (रविवार )२०२५ दरम्यान स्व.बलभीम (अण्णा ) जगताप क्रीडा नगरी , वाडीयापार्क क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे आयोजित केल्या जाणार आहेत. सदर स्पधेर्च्या उत्कृष्ट आयोजनासाठी रूपये ५ करोड रूपये खर्च अपेक्षित असून आपण अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे किमान ५० लक्ष निधी वितरीत करावा अशाबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६६ अन्वये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सदर कलमात नमूद केलेल्या बार्बीसाठी किंवा अन्य कोणत्याही बार्बीसाठी तरतूद करता येईल. अधिनियमातील कलम ६६ (४१) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे.

"कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ किंवा करमणुकीचे कार्यक्रम यासाठी कोणतेही अंशदान देणे"

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये "सामाजिक संस्थांना देणगी " या लेखाशिर्षकाखाली रक्कम रूपये २० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत १५ लक्ष रूपये शिल्लक आहेत. तरी विषयांकित प्रकरणी अहमदनगर (अहिल्यानगर ) जिल्हा कुस्तीगीर संघ यांना अंशदान दयावयाचे झाल्यास "निवडणूक खर्च " या लेखाशिर्षकामध्ये आजमितीस रक्कम रूपये ५,८०,१९,५१०/- एवढी रक्कम शिल्लक आहे.

निवडणूक खर्च या लेखाशिर्षातून ४० लक्ष तरतूद कमी करून  सामाजिक संस्थांना देणगी देणे या लेखाशिर्षात रक्कम रू.४० लक्ष तरतूद वाढविण्यात यावे. याबाबत अर्थ विभागाने कार्यवाही करून वरिष्ठ गट यादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्तीस्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२०२५ स्पर्धेच्या आयोजनासाठी रक्कम रूपये २५ लक्ष  "सामाजिक संस्थांना देणगी देणे" या लेखाशिर्षातून अंशदान देणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ११४** **दिनांक :२१/०१/२०२५**

**विभाग : सामान्य प्रशासन विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अखिल भारतीय मराठी नाटय परिषद १०० वे नाटयसंमलेन २०२५-करिता ५० लक्ष अनुदान मिळणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उपरोक्त विषयाबाबत श्री प्रसाद बेडेकर,अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाटयपरिषद यांनी उक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले की, अहिल्यानगर महानगरपालिकेने नेहमीच शहरातील सांस्कृतिक,सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे या शहराची ओळख सांस्कृतिदृष्टया समूद शहर म्हणून झाली आहे. आगामी अखिल भारतीय मराठी नाटय परिषद १०० चे नाटय संमेलन २०२५ चे आयोजन आपल्या शहरात करण्यात येत आहे, ही आपल्या नगरवासियांकरिता खूप अभिमानाची गोष्ट आहे. या नाटयसंमेलनामुळे मराठी नाटकांची परंपरा वृध्दींगत होईल आणि नाटय क्षेत्रातील कलाकारांना व रसिकांना प्रेरणा मिळेल. सदर संमेलनाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मोठया प्रमाणात आर्थिक पाठबळाची गरज आहे. त्यामुळे आपल्या अहिल्यानगर महानगरपालिकेकडून या उपक्रमासाठी रक्कम रूपये ५० लक्ष आर्थिक अनुदान मंजूर करण्याची विनंती करित आहोत. तरी सदर संमलनासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेकडून ५० लक्ष अनुदान देण्यात यावे अशाबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६६ अन्वये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सदर कलमात नमूद केलेल्या बाबींसाठी किंवा अन्य कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल. अधिनियमातील कलम ६६ (४१) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे.

"कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ किंवा करमणुकीचे कार्यक्रम यासाठी कोणतेही अंशदान देणे"

अंदाजपत्रक सन २०२४-२०२५ मधील"सामाजिक संस्थांना देणगी " या लेखाशिर्षकातून अंशदान देता येईल.

अहिल्यानगर शहरात होणा-या अखिल भारतीय मराठी नाटय परिषद १०० वे नाटयसंमलेन २०२५ करिता रक्कम रूपये २५ लक्ष "सामाजिक संस्थांना देणगी देणे" या लेखाशिर्षातून अंशदान देणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |